ePaper
...तर खडसेंचा जावई आत्महत्या केल्याशिवाय राहणार नाही": शरद पवार



|| वर्ष - 6 | अंक - 362 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | शनिवार दि. 22 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मुख्यमंत्रीपदावर आत्ताच 'क्लेम'!

## » अजित पवार यांची रोखठोक भूमिका : 'दिलखुलास दादा' या प्रखट मुलाखतीचे आयोजन

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी 2024 च्या विधानसभा निवडणुकीनंतर काय, आता म्हटले तरी मुख्यमंत्रीपदावर क्लेम ठेवण्याची तयारी असल्याचे मोठे विधान विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केले. दैनिक 'सकाळ'तर्फे अजित पवार यांच्या 'दिलखुलास दादा' या प्रखट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते.**

चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झालेल्या कार्यक्रमाला अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार, त्यांच्या भगिनी यासह माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार सुनील तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार सुनील शेळके, अशोक पवार, अतुल बेनके, नीलेश लंके, अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, रमेश थोरात, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे आदी उपस्थित आहेत. राष्ट्रवादी कॉँग्रेसला उपमुख्यमंत्रीपदाचे आकर्षण का आहे? असे विचारले असता अजित पवार म्हणाले, 2004 मध्ये राष्ट्रवादीच्या 71 जागा आल्या होत्या. त्यावेळी मुख्यमंत्रीपद मिळेल अशी शक्यता होती. पण, दिल्लीत काय घडले माहिती नाही.

कॉँग्रेसकडे मुख्यमंत्रीपद दिले. पण, त्यावेळी राष्ट्रवादीकडे मुख्यमंत्रीपद आले असते तर आर. आर.पाटील मुख्यमंत्री झाले असते. मी स्पष्ट बोलतो. मनात आहे ते सांगतो. लोकांना मला ऐकायला आवडते. त्यामुळे माझा 'टीआरपी' वाढतो. काहीजण हातचे राखून बोलतात.

### फडणवीस यांचे 'गचुरे' धरावे का?

मी विरोधी पक्षनेता म्हणून चुकीच्या कामाविरोधात बोलतो. राजकारणात विनाकारण कोणावर टीका करत नाही. चुकीचे असेल तरच टीका करत असतो. राजकीय विचारधारा वेगळी असली. तरी, आम्ही एकमेकांचे दुष्मन नाहीत. देवेंद्र फडणवीस यांचे 'गचुरे' धरल्यावरच आमचे साटेलोटे नाही असे सर्वांना वाटेल का? आमचे काही साटेलोटे नाही. आमचा जन्म एकाच दिवशीचा असून साल वेगळे आहे. बाकी काही नाही, असेही पवार म्हणाले.

### तोपर्यंत एकनाथ शिंदे यांचे मुख्यमंत्रीपद जाईल

अनुभव नसला की मी-मी म्हणणारे चुकतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नरेंद्र मोदी यांच्या ऐवजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पंतप्रधान म्हटले होते. तर, राज्य लोकसेवा आयोग (एमपीएसीचा) प्रश्न निवडणूक आयोगाकडे आहे असे म्हणाले होते. ते आता अनुभवातून शिकतील. जोपर्यंत शिकतील तोपर्यंत त्यांचे मुख्यमंत्री पद जाईल.

### मतांची विभागणी टळल्यास २०२४ ला वेगळे चित्र दिसेल

सत्ताधारी पक्षाचा पराभव करण्याकरिता विरोधकांची मते एकत्रित राहिली पाहिजेत. मतांची विभागणी होता कामा नये. मतांची विभागणी न झाल्यास काय होते हे कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत दिसले. त्यामुळे विधानसभेच्या २०२४ च्या निवडणुकीमध्ये समन्वय ठेवून महाविकास आघाडीने जागावाटप केले. तर, वेगळे चित्र पहायला मिळेल.




चिंचवड: 'सकाळ' माध्यम समुहातर्फे विरोधी पक्षनेते अजित पवार यांची 'दिलखुलास अजितदादा' ही मुलाखत संपादक सम्राट फडणीस यांनी घेतली.

## ... तर चिंचवडमध्ये विजय मिळाला असता!

» स्वतःचे घरचे काम आहे असे समजून पुणे, पिंपरी -चिंचवड मधील कामे करतो. ती आमची जबाबदारी असते. म्हणून मी सकाळी सहा वाजल्यापासून कामाला सुरुवात करतो. शहरी आणि ग्रामीण असा आम्ही भेद करत नाही. 1999 ते 2014 पर्यंत नगरविकास, गृहनिर्माण हे शहरी भागासंदर्भातील खाते मिळाले नाही. त्यामुळे शहरी भागासाठी निर्णय घेता आले नाहीत. त्यामुळे 2019 मध्ये जाणीवपूर्वक गृहनिर्माण खाते राष्ट्रवादीने घेतले होते. निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी सुरू झाली होती. पण, तोपर्यंत सरकार गडगडले. सत्ताधारी पक्षाचा पराभव करण्याकरिता विरोधकांची मते एकत्रित राहिली पाहिजे. मतांची विभागणी न झाल्यास काय होते हे कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत दिसले. रविंद्र धंगेकर निवडून आले. चिंचवडमध्ये बंडखोरी झाली नसती तर महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आला असता, असेही विरोधी पक्षनेते अजित पवार म्हणाले.

## ... तर ठाकरेंचे मुख्यमंत्रीपद राहिले असते!

»एकनाथ शिंदे यांच्या बंडाबाबत आमच्या कानावर सातत्याने येत होते. उद्धव ठाकरे यांचे सरकार आल्याच्या पहिल्या दिवसापासून हे सरकार पाडण्यासाठी भाजप प्रयत्न करत होते. शिंदे यांना ठाण्यातील अधिकारी नेमण्याचे अधिकारी दिले होते. त्याच अधिकाऱ्यांनी शिंदे यांना सुरतला सुरळीतपणे पोहोचवले. 2019 मध्ये देवेंद्र फडणवीस आणि मी शपथ घेतल्यानंतर महाविकास आघाडीच्या आमदारांना ज्याप्रमाणे नेत्यांनी एकत्र ठेवले. त्याचप्रमाणे शिवसेनेतील बंडावेळी तीन पक्षाच्या नेत्यांनी आमदारांना एकत्र ठेवले असते तर आज उद्धव ठाकरे मुख्यमंत्री राहिले असते, असेही पवार म्हणाले.

## तर अजित पवार मुख्यमंत्री होऊ शकतात"; भाजपा नेते रावसाहेब दानवेंचं सूचक विधान!



» राष्ट्रवादी कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार हे मागील काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रस्थानी आहेत. राष्ट्रवादीतील ४० आमदारांसह अजित पवार भारतीय जनता पार्टीला पाठिंबा देतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. या चर्चेला अजित पवार यांनी स्वत: पूर्णविराम दिला आहे. जिवात जीव असेपर्यंत मी राष्ट्रवादी कॉँग्रेसबरोबरच काम करेन, असं विधान अजित पवारांनी केलं. सत्तांतराच्या चर्चेवर अजित पवारांनी स्पष्टीकरण दिलं असलं तरी ते मुख्यमंत्री पदावरून पुन्हा एकदा चर्चत आले आहेत. अजित पवारांनी नुकतंच 'सकाळ' वृत्तसमूहाला दिलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्री होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदावर दावेदारी ठेवण्याची तयारी आहे. मला शंभर टक्के मुख्यमंत्री होण्यास आवडेल, अशी प्रबळ इच्छा अजित पवार यांनी व्यक्त केली. अजित पवारांच्या या विधानानंतर भाजपा नेते रावसाहेब दानवे यांनी सूचक विधान केलं आहे. अजित पवार बहुमताच्या बाजुने आले तर ते मुख्यमंत्री होऊ शकतात, असं विधान रावसाहेब दानवेंनी केलं आहे. ते जालना येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अजित पवारांच्या मुख्यमंत्री पदाच्या इच्छेबाबत विचारलं असता रावसाहेब दानवे म्हणाले, "ज्यावेळी कॉँग्रेस आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस एकत्र निवडणूक लढले, त्यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेसला कॉँग्रेसपेक्षा जास्त जागा मिळाल्या होत्या. तरीही अजित पवारांना मुख्यमंत्री होता आलं नाही. या राजकारणातल्या घटना आहेत.

# पालिकेचे 30 कोटी वाचणार!

## » करपात्र मूल्यातून 10 टक्के रक्कम वजा करण्याचा पुन्हा निर्णय

।पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे महापालिकेने १९७०मध्ये सर्वच मालमत्तांची १०ऐवजी १५ टक्के रक्कम करपात्र मूल्यातून वजा करण्याचा निर्णय घेतला होता. राज्य सरकारने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार ही तरतूद पुन्हा १० टक्के करण्यात आली असून, महापालिकेचे त्यामुळे वर्षाला ३० कोटी रुपये वाचणार आहेत. महापालिकेच्या याच निर्णयाला महालेखापालांनी आक्षेप घेतल्याने त्याचा फटका ४० टक्के सवलतीला बसला होता. भविष्यात ही ४० टक्के सवलतीची समस्या पुन्हा उद्भवू नये, यासाठी कायद्यातील तरतूद कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा दावा उच्चपदस्थ सूत्रांनी केला आहे.**



महाराष्ट्र महापालिका अधिनियमानुसार मालमत्ता करआकारणी करण्यात येणाऱ्या कुठल्याही मालमत्ता, जमिनीचे करपात्र मूल्य ती जमीन, मालमत्तेला मिळणाऱ्या अपेक्षित दराने भाड्याने दिली जाईल, त्या वार्षिक दराच्या १० टक्के रक्कम ही एकूण करपात्र मूल्यातून वजा करण्याची तरतूद आहे. महापालिकेने अधिनियमातील तरतुदीच्या विसंगत धोरण लांबविल्याचा फटका महालेखापालांनी घेतला होता.

**पुढील आठवड्यात ऑनलाइन बिले**

बिलांची छपाई करून पोस्टाने ती मिळकतकरधारकांना पाठवण्यासाठी १५ मेपर्यंतचा कालावधी लागेल, अशी शक्यता महापालिकेने व्यक्त केली आहे. त्यामुळे पुणेकरांना मिळकतकर वेळेत भरण्यासाठी दिली जाणारी सवलत जून अखेरपर्यंत मिळणार आहे.

### हा आहे इतिहास

» राहत्या घरासाठी पुणेकरांना मिळकतकरातील सर्वसाधारण करात १९७०पासून ४० टक्के सवलत दिली जात होती. महापालिकेने १९६९मध्ये केलेल्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार ४० टक्के सवलत देतानाच सर्वच मालमत्तांची १० ऐवजी १५ टक्के रक्कम करपात्र मूल्यातून वजा करण्याचा निर्णय घेतला होता. महालेखापालांच्या आक्षेपानंतर २०१९पासून या दोन्हीही सवलती रद्द करण्यात आल्या. पुणेकरांना १९७०पासून मिळालेली सवलत पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्याचे आदेश दिले. राज्य सरकारने यात आपल्या अधिकारात हस्तक्षेप करून ही रक्कम २०१९पासून वसूल करण्याची सवलत दिली होती.

### कायद्यात बदलांची आवश्यकता

» महाराष्ट्र महापालिका अधिनियमात पूर्वलक्षी प्रभावाने सवलतीची तरतूद नाही. त्यामुळे कायद्यात दुरुस्ती करून पूर्वलक्षी प्रभावाने मिळकतकरात आर्थिक सवलत देण्याचे अधिकार राज्य सरकारला घ्यावे लागणार आहेत. तोपर्यंत पुणेकरांची अडचण होऊ नये, यासाठी नगरविकास विभागाकडून महापालिकेला आदेश देऊन मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी करण्याची सूचना करण्यात येणार आहेत. दरम्यानच्या काळात सरकारकडून कायद्यात बदल करून तसा अध्यादेश प्रसिद्ध करण्यात येईल.

---

# शिवाजीनगर-लोणावळा लोकल प्रवासी संख्येत वाढ


## लोकल गाड्यांची प्रवासी संख्या 23 टक्क्यांनी वाढल्याची रेल्वे प्रशासनाकडून माहिती

।पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

| | |
|---|---|
| लोकलची दिवसाला सरासरी प्रवासी संख्या | ४,०६४ |
| जानेवारीतील दिवसाला सरासरी प्रवासी | ४,८२१ |
| फेब्रुवारीतील दिवसाला सरासरी प्रवासी | ४,९८७ |
| मार्चमधील दिवसाला सरासरी प्रवासी | |

शिवाजीनगर येथील लोकल टर्मिनल सुरू केल्यानंतर पुणे-लोणावळादरम्यान धावणाऱ्या सहा लोकल गाड्यांना प्रवाशांचा प्रतिसाद वाढला आहे. या लोकल गाड्यांची प्रवासी संख्या २३ टक्क्यांनी वाढली असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

पुणे स्टेशनवरील ताण कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने शिवाजीनगर लोकल टर्मिनल विकसित केले. या ठिकाणी लोकलसाठी एक स्वतंत्र लाईन टाकण्यात आली आहे. त्या ठिकाणाहून ६ फेब्रुवारी २०२३ पासून सहा लोकल सुरू करण्यात आल्या आहेत. पुणे स्टेशन येथून पुणे लोणावळा दरम्यान ४० लोकल धावत होत्या. त्यापैकी



सहा लोकल शिवाजीनगर लोकल टर्मिनल येथून सोडण्यास सुरुवात केली. पुणे स्टेशनवरील लोकल गाड्या शिवाजीनगर येथून सोडण्यास सुरुवात केल्यानंतर प्रवाशांनी विरोध केला होता. त्या गाड्या पुणे स्टेशन येथूनच सोडण्याची मागणी लावून धरली होती. पण, रेल्वे प्रशासनाने येथून हळूहळू गाड्या वाढविल्या. त्यामुळे प्रवाशांना आता शिवाजीनगर येथून जाणाऱ्या लोकलची सवय झाली आहे. प्रवासी संख्या दिवसेंदिवस वाढत आहे

पुणे स्टेशन येथून सहा लोकल धावत असताना त्यांना दिवसाला साधारण चार हजार ६४ प्रवासी मिळत होते. पण, याच गाड्या शिवाजनगर लोकल टर्मिनल येथून सोडण्यास सुरुवात केल्यानंतर दिवसाला प्रवासी संख्या पाच हजारांपर्यंत पोहोचली आहे. गेल्या दोन महिन्यात शिवाजीनगर येथून पुणे लोणावळा दरम्यान धावणाऱ्या सहा लोकलमधून दोन लाख ९३ हजार प्रवाशांनी प्रवास केला आहे. प्रत्येक महिन्यात प्रवाशांचा प्रतिसाद वाढत आहे.

# अंगणवाडी लवकर सोडा

## » वाढत्या उष्णतेमुळे जिल्हा परिषदेचा आदेश

।पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**उन्हाच्या वाढत्या चटक्यामुळे अंगणवाडीतील मुलांना लवकर घरी सोडण्याचा आदेश जिल्हा परिषदेने दिला. जिल्ह्यातील अंगणवाडीतील मुलांना दुपारी साडेबाराऐवजी साडेअकरा वाजता पालकांकडे सुपूर्त करण्याबाबत सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी जामसिंग गिरासे यांनी दिल्या आहेत.**



जिल्ह्यात अंगणवाड्यांची एकूण संख्या ४ हजार ३८४ आहे. या अंगणवाड्यांमध्ये ३ लाख १२ हजार मुले पूर्व प्राथमिक शिक्षण घेत आहेत. सध्या जिल्ह्यात बहुतांश शाळांना उन्हाळ्याची सुटी सुरू झाली असली, तरी गावांगावांतील अंगणवाड्या सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर उष्णतेच्या लाटेसदृश्य स्थितीमुळे मुलांची विशेष काळजी घेण्याबाबत जिल्हा परिषदेने परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या.

दर तासाने मुलांनी पाणी पिण्यासाठी घंटा वाजवावी. पाणी शुद्ध आणि थंड असावे. अंगणवाडीत क्षारसंजीवनी (ओआरएस) आणि वैद्यकीय साहित्य उपलब्ध असावे. मुलांना ताजा आणि स्वच्छ आहार द्यावा. मुलांना अंगणवाडीत पाठवताना चप्पल, बूट घालून पाठवण्याबाबत, अंगभर सूती-सैलसर कपडे घालण्याबाबत आणि दुपारी साडेबारा ते तीन या वेळेत मुलांना घरातच ठेवण्याबाबत पालकांचे प्रबोधन करावे. अंगणवाडीच्या खिडक्या उघड्या ठेवून हवा खेळती राखावी, अंगणवाडी क्षेत्रात कार्यरत आशासेविकांच्या संपर्कात राहावे.

# ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्पातून ‘पॉवर लाईन’च्या कामाचा ‘श्रीगणेशा’!

## » आ. महेश लांडगे यांच्याहस्ते भूमिपूजन : महापालिका प्रशासनाला मिळणार अल्पदरात वीज

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने उभारलेला राज्यातील ‘रोलमॉडेल’ प्रकल्प ‘वेस्ट टू एनर्जी’ अर्थात कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, त्यामाध्यमातून अवघ्या ५ रुपये प्रतियुनिटप्रमाणे प्रशासनाला वीज मिळणार आहे. त्यासाठी प्रकल्पापासनू ‘पॉवर लाईन’ टाकण्याच्या कामाला सुरूवात करण्यात आली.**



मोशी कचरा व्यवस्थापन केंद्र येथे कचऱ्यापासून वीज निर्मितीच्या प्रकल्प उभारण्यात आला आहे. त्याचा पुढचा टप्पा म्हणजे कचरा व्यवस्थापन केंद्रापासून महावितरणच्या इंद्रायणी सबस्टेशनपर्यंत ‘पॉवर लाईन’ टाकण्यात येत आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता उदय भोसले, दिपक मदने, प्रमोद भोसले, मोहिनी गुळुमकर यांच्यासह पिंपरी-चिंचवड महापालिकेचे कार्यकारी अभियंता अनिल भालसाखले, उपकार्यकारी अभियंता सत्वशील शितोळे, कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले, संदीप जाधव यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

महापालिकेचे कार्यकारी अभियंता अनिल भालसाखले म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महानगपालिकेच्या ‘वेस्ट टू एनर्जी’ या प्रकपाचे काम अखेरच्या टप्यात आसून, ‘पॉवर लाईन’ टाकण्याचे काम सुरू झाले आहे. साधारण 'पॉवर लाईन' ची लांबी ४.५ किलोमीटर इतकी आहे.

या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज प्रति युनिट ५ रुपये प्रमाणे आगामी २० वर्षांकरिता प्रशासनाला मिळणार आहे.

यामुळे महापालिकेच्या वीज बिलामध्ये बचत होणार असून, कचऱ्याचा प्रश्नही सुटण्यास मदत होणार आहे. प्रकल्पाची वीज निर्मिती क्षमता दिवसाला १४ मेगा वॅट इतकी आहे.

> **“पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून मोशी कचरा डेपोवर कचरा टाकला जातो. त्यामुळे कचऱ्याचे डोंगर निर्माण झाले. परिणामी, पर्यावरण आणि नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. “भोसरी व्हीजन-२०२०” च्या माध्यमातून आम्ही ‘वेस्ट टू एनर्जी’ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. हा प्रकल्प कार्यान्वयीत होत असून, लवकरच निर्माण होणारी वीज महापालिका प्रशानाला मिळणार आहे. त्यामुळे आश्वासन पूर्तीचा आनंद आहेच. त्यासोबत शहरातील कचरा समस्या सोडवण्यात यश मिळत आहे. याचे समाधान वाटते.**
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# शाळा परिसरातील धोकादायक होर्डिंग हटवा!

## » संजीवन सांगळे : महापालिका आयुक्तांना निवेदन

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुलांच्या शाळेच्या समोर असणारे धोकादायक होर्डिंग ताबडतोब काढावेत. छोटे मोठे अनधिकृत फ्लेक्स जे लावत असतील त्यांच्यावर कडक ऍक्शन घेण्याची मागणी चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली आहे.**





याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील बऱ्याच लहान मुलांच्या शाळेच्या समोर तसेच शाळेच्या बस ज्या ठिकाणी उभा राहतात अशा ठिकाणी खूप मोठे होर्डिंगचे सांगाडे उभे केलेले आहेत. ही खूप धोकादायक बाब आहे. हे होर्डिंगसाठी कोणी कशी परवानगी दिली हे अनाकलनीय आहे.

शहरातील आशा सर्वच शाळेच्या समोर असणाऱ्या होर्डिंग त्वरित काढून घ्यावेत तसेच पिंपरी चिंचवड शहरात जे नागरिक, राजकीय पक्षाचे नेते छोटे मोठे अनाधिकृत होर्डिंग,फ्लेक्स लावतील त्यांच्यावर कारवाई करून आशा राजकीय पक्षांच्या नेत्यांना निवडणूक लढवण्यास प्रतिबंध करता येईल का, अशाप्रकारे काही करता येईल का, यावर विचार व्हावा आणि कोणत्याही राजकीय दबावाखाली न येता आशा सर्व होर्डिंग काढून शहराचे विद्रुपीकरण थांबावे.

### आकाश चिन्ह विभागाचा गलथान कारभार...

**» महापालिकेच्या आकाश चिन्ह परवाना विभागाचा कारभार अतिशय गलथान आहे. हा विभाग सर्वच राजकीय नेत्यांच्या दबावाखाली काम करतोय.आज जे शहरात सर्व ठिकाणी राजकीय नेत्यांच्या वाढदिवसाचे व इतर राजकीय कार्यक्रमाचे अनाधिकृत होर्डिंग व फ्लेक्स लागत आहेत.**
**शहर विद्रुप होत आहे याला सर्वस्वी आकाश चिन्ह परवाना विभाग जबाबदार आहे. कमीत कमी लहान मुलांच्या शाळेच्या समोरील उभे केलेले हे होर्डिंगचे सांगाडे त्वरित काढावे आणि भविष्यात काही अनर्थ घडणार नाही यांची दक्षता आयुक्तांनी घ्यावी ही आमच्या फेडरेशनची शहरातील नागरिकांच्या वतीने मागणी आहे.**

## संपादकीय »

# लोकसंख्यावाढीचा ब्रम्हराक्षस


***काही देश विकासाच्या बाबतीत पुढे असतात, तर काही आर्थिक... काही साक्षरतेत पुढे असतात, तर काही तंत्रज्ञानाच्या बाबतीत.. आपला भारत मात्र लोकसंख्येच्या बाबतीत अव्वल ठरला आहे. बलाढ्य चीनला मागे टाकत भारताने नकोसा असलेला विक्रम नोंदवला आहे.***

युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडने (यूएनएफपीए) यासंदर्भातील ताजी आकडेवारी जाहीर केली आहे. या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या १४२८. ६ दशलक्षांवर गेली आहे. म्हणजेच भारतात आता चीनपेक्षा सुमारे ३० लाख लोक जास्त असले तरी, ही तफावत पुढे विस्तारत जाणार आहे. या अहवालानुसार २०५० पर्यंत चीनची लोकसंख्या आणखी कमी होऊन १३१ कोटी, तर भारताच्या लोकसंख्येत वाढ होऊन ती १६६ कोटी झालेली असेल. मुंबईची लोकसंख्या ४.२४ कोटी झालेली असेल. वास्तविक, भारताची लोकसंख्या २०२८ पर्यंत चीनपेक्षा अधिक असेल, असा निष्कर्ष संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक लोकसंख्या अहवालात काढण्यात आला होता, पण २०२८ ची वाट न बघता २०२३ च्या सुरुवातीलाच भारताने हा 'पराक्रम' केला आहे. लोकसंख्या वृद्धीचा दर आटोक्यात आणण्यात चीन यशस्वी झालेला आहे. भारतात हा दर चढा आहे. चीनचा जन्मदर गतवर्षी होता, त्या तुलनेत उणे झालेला आहे. चीनने त्यासाठी बऱ्याच उपाययोजना, कायदेही केले. भारताने प्रबोधनापलीकडे फारसे काहीही केलेले दिसत नाही. न्यूनतम लोकसंख्येचा व लोकसंख्यावाढीचा आर्थिक विकासावर प्रतिकुल परिणाम घडून येत असतो. पर्याप्त लोकसंख्या ही विकासाच्या दृष्टीने आदर्श लोकसंख्या समजली जाते. लोकसंख्यावाढीवर परिणामकारक बंधने न घातल्यास देशाच्या अन्नधान्य पुरवठ्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊन दारिद्र्यात वाढ होत जाते. उदा. १९९१ मध्ये भारताची लोकसंख्या ८४.४ कोटी झाली. अन्नधान्य उत्पादन १७० दशलक्ष टन इतके वाढले; परंतु प्रचंड लोकसंख्यावाढीमुळे दरडोई अन्नधान्य उपलब्धता मात्र फारशी वाढू शकली नाही. कारण अन्नधान्य उत्पादन ४० वर्षांत ३.५ पटींनी वाढले, तरी दरडोई अन्नधान्य उपलब्धी केवळ १.२ टक्केच वाढू शकली. खरे तर, भारतातील भौगोलिक व सामाजिक परिस्थिती जनन प्रक्रियेस किंवा लोकसंख्यावाढीस पोषक आहे.



भूमिका

# राष्ट्रीय दृष्टिकोनातून इतिहासाचे पुनर्लेखन



राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या १० वी आणि १२ वीच्या अभ्यासक्रमातील काही धडे वगळल्याने नव्या वादास तोंड फुटले आहे. वास्तविक परिषदेचे प्रमुख दिनेश सकलानी यांनी धडे बदलासाठीची सर्व आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून अभ्यासक्रम सुसूत्रीकरण पुस्तिकेतील संदर्भानुसार निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे, तरीही त्याचा बागुलबुवा उभा केला जात आहे.

देशाच्या इतिहासाचा असा राजकीय खेळ होणे हे दुर्भाग्यपूर्ण आहे. भारतात इतिहासाचे अध्ययन व लेखनाची परंपरा प्राचीन आहे. इतिहासाकडे सत्याच्या शोधासाठी सतत चालणाऱ्या प्रयत्नांच्या प्रक्रियेचे अध्ययन म्हणून बघितले जाते. कोणत्याही देशाचा इतिहास तेथील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. इतिहासास भूतकाळाचा आरसा, वर्तमानकाळाचा आत्मविश्वास आणि भविष्यकाळाच्या कल्पनेचे स्वरूप म्हणून मानले जाते. भारतात शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांमधून शिकवल्या जाणाऱ्या इतिहासाचे विद्यमान स्वरूप बघितले तर त्यावर ब्रिटिश साम्राज्यवाद आणि वसाहतवादाचा अजूनही पगडा आहे. याचे कारण सध्या शिकवला जाणारा इतिहास हा प्रामुख्याने मुघल आणि ब्रिटिश वखरकारांनी लिहून ठेवलेल्या मजकुरावर आधारित आहे. थके आणि तथ्यहीन घटनांचा समावेश केला. यामागे त्यांचा मुख्य उद्देश भारतात अंतर्गत संघर्ष निर्माण करणे, भारतीय समाजास दिग्भ्रमित करणे, त्याचा तेजोभंग करणे आणि स्वत:चे सरकार सुदृढ आणि स्थिर करणे असा होता.

### हाँगकाँगचे उदाहरण

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात भारतातील काही थोर पुरुषांनी ब्रिटिशांच्या या कारस्थानावर ताशेरे ओढले होते. स्वामी विवेकानंदांनी १८९१ मध्ये कोलकाता विद्यापीठांत विद्यार्थ्यांसमोर जे भाषण दिले त्यांत त्यांनी ब्रिटिशांच्या इतिहासास "स्यूडो सेक्युलर प्रोपगंडा" म्हटले. महर्षी अरविंदांनी त्यांच्या 'उत्तरपारा' येथील प्रसिद्ध भाषणात इतिहासाच्या चिंतनाची व्याख्या केली होती. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आपल्या साहित्यातून वास्तवदर्शी इतिहास लेखनाची आवश्यकता असल्याचे म्हटले होते. जागतिक इतिहास असे दर्शवितो की पारतंत्र्यात असलेले देश जेव्हा स्वतंत्र झाले तेव्हा त्या देशांनी स्वतःचा स्वतंत्र इतिहास लिहिला. हाँगकाँग (सध्या चीनचा विशेष दर्जायुक्त प्रांत) हे त्यांचे एक जिवंत उदाहरण आपल्यासमोर आहे. १९९७ मध्ये ब्रिटिशांच्या जोखडातून हाँगकाँग मुक्त झाला. त्यानंतर केवळ दोन महिन्यांच्या आत तेथील राज्यकर्त्यांनी ब्रिटिशांनी शिकवलेला इतिहास बंद केला आणि स्वतःचा वास्तव इतिहास पाठ्यक्रमात लागू केला.

इतिहासाचार्य राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे, दत्तो वामन पोतदार, रियासतकार सरदेसाई, जदुनाथ सरकार, सेतु माधवराव पगडी हे आपल्या देशातील नामवंत इतिहासकार. या सर्वांनी उपलब्ध पुरावे व साधनांचा योग्य उपयोग करून वस्तुनिष्ठ इतिहास लिहिला. कोणत्याही देशाचा इतिहास राष्ट्रीयत्व जागवण्यासाठी महत्त्वाचा असतो. जो समाज इतिहास विसरतो तो इतिहास घडवू शकत नाही कारण इतिहासातील आदर्श, पराक्रम, महापुरुषांची उदाहरणे नव्या पिढीस नेहमी प्रेरणा देतात. मात्र हा इतिहास जो खरा आहे, सत्य आहे तोच समाजापुढे येणे आवश्यक असते कारण त्यातून देश उभा राहातो. राष्ट्रीय दृष्टिकोनातून त्याचे लेखन त्यासाठी आवश्यक ठरते. त्यामुळे इतिहासाचे पुनर्लेखन करणे म्हणजे देश मागासलेपणाकडे झुकत आहे असा आरोप करणे उचित नाही.

# हळव्या वणव्यांचा वैशाख

**माणसांनी वाटेवर सावली अंथरणारे वृक्ष तोडून टाकले. नदीवर नवा उंच पूल बांधला की यांना विकास झाल्यागत वाटतं, मात्र नदीचा नाला झाला, त्याचं काय? हे पाहून वैशाख थंडगार पडू लागला आजकाल. अशा वेळी मग वैशाखाचं डोकं फिरतं. तो सैरभैर होतो अन् पाण्याची काळजात साठवून ठेवलेली वाफ मृग नक्षत्राची वाटही न पाहता द्रविभूत होऊन वैशाखाच्या डोळ्यातून बरसून जाते; अन् आपण म्हणतो अवकाळी पाऊस आला... वैशाख २१ एप्रिलपासून सुरू झाला आहे, त्यानिमित्त...**

वसंत आणि चैत्राच्या धगीवरच ग्रीष्माची चूल पेटत असते. अवघा ग्रीष्म अंगावर घेतो तो वैशाख. त्यासाठी तो वणव्यांचा महिना म्हणून कुख्यात झालेला. त्याने ते असिधाराव्रत धारण केले तेच मूळात हलाहल गळ्यात सामावून घेणाऱ्या आदिदेवासारखंच आहे.



हेमंतात ऊन्हं किशोरवयात येतात. त्यांना मग अलवार जाणिवांची कोवळी पानं फुटतात. हेमंताच्या दवभरल्या पहाटे तिचे गुलाबी तळवे तळ्याच्या काठी हिरवळीवर दाह पेरत जातात आणि मग अंमळ उशिराने अवतरणारी उन्हं तिच्या त्या अलवार पाऊलठशांवर आपला जीव ओवाळून टाकतात. मुग्ध तळ्याकाठी उन्हं रोजच थंडीने गारठलेल्या झाडांच्या पानांच्या डोळ्यातून तिच्या येण्याची वाट पाहू लागतात. ती मात्र गवतफुलांच्या आडोशाने दडून बसलेले दवाचे थेंब वेचत फिरत असते. ऊन्हं मग तिच्यासाठी बेभान होतात. म्हणून हेमंतातली उन्हं तहान-भूक विसरतात. शिशिरातली पानगळ म्हणजे हेमंतातल्या ऊन्हांचं तिच्या प्रेमात पडून झुरणं असतं. वसंतात मग उन्हाची अन् तिची गाठभेट होत असावी. फुलांच्या सावलीत डोळ्यात डोळे घालून ती दोघं एकमेकांची गाणी गात भरदुपारचीही पहुडलेली ज्यांना आभाळाचे डोळे आहेत त्यांना दिसतात. आभाळाचे डोळे असलेली माणसं तशी प्रेमाच्या बाबत हळवी- नाजूक आणि शहाणी असतात. ती त्यांच्या या निरागस एकांताचा बोभाटा करत नाहीत. ऊन्हं आता धिटावलेली असतात. अधिक तरुणही झालेली असतात. उन्हं अशी तरुण झाली की चैत्र सुरू होतो.

चैत्र तसा आर्त आणि आर्ष महिना आहे. वसंताचे सगळेच देणे तो फुलवत नेतो. वसंतातल्या मोहोरोला म्हणूनच चैत्रात बाळफळं लगडून आलेली असतात. फुलांचे रंग अधिक आर्त होतात. त्यांना सुगंधाची भाषा येते आणि मग चैत्रातल्या फुलांच्या सान्निध्यात आलेली पाखरं गातातही अनावर सुगंधी गाणं... त्या गाण्यावर ती ऊन्हसखी अधिकच फुलून येते. फुलण्याच्या साऱ्या मर्यादा पार करू पाहते अन् अशा वेळी वास्तवाचे चटके ऊन्हाला जाणवू लागतात. हृदयाच्या एक वित खालीच जठर असतं आणि त्याच्या भुकेला जे काय दान मिळतं, त्यावरच हृदय पोसलं जात असतं... वसंतातले झरे आटले अन् हृदयापर्यंत जीवनाचा प्रवाह आटला, की समजायचं आता वणव्यांची वैशाख भाषा सुरू झालेली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भाजपचा करिष्मा फक्त मोदींमुळेच!

## देशभर भाजप वाढवला: अजित पवारांकडून मोदींचं कौतुक

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विरोधी पक्ष नेते अजित पवार भाजपात (AJIT PAWAR) जाणार, अशा चर्चा रंगल्या असताना अजित पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचं कौतुक केलं आहे. 'भाजपचा करिष्मा फक्त आणि फक्त नरेंद्र मोदींमुळेच आहे. त्यांनी देशभर भाजप पसरवला, अशा शब्दांत त्यांनी मोदींचं कौतुक केलं आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये सकाळ माध्यम समूहाच्यावतीने अजित पवार यांची 'दिलखुलास दादा' ही प्रकट मुलाखत घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी राज्यातील आघाडी आणि भाजपच्या कार्यशैलीसंदर्भात भाष्य केलं आहे.**



अजित पवार म्हणाले की, 2014 मध्ये पहिल्यांदाच बहुमताने भाजप निवडून आला. 2014 आणि 2019 मध्ये एकहाती सत्ता घेणारा पक्ष हा भाजपच होता. या काळात नरेंद्र मोदी यांच्यामुळे भाजप सर्वदूर पोहचला. नरेंद्र मोदींचा करिष्मा हा देशात चालला आणि त्यांनी देशातील करोडो जनतेचा विश्वास संपादन केला. त्यांची भाषणंदेखील गाजले. भाषणं करत असताना त्यांनी जनतेला आपलंसं केलं होतं. त्यानंतर जनतेला वाटलं की आपण नरेंद्र मोदी यांच्या हाती देशाचे सूत्रं द्यावीत आणि जनतेनेही मतांच्या माध्यमातून नरेंद्र मोदींकडे देशाचे सूत्रं दिली, असं म्हणत त्यांनी नरेंद्र मोदींचं कौतुक केलं आहे.

### यापूर्वी 'हे' कोणालाही जमलं नाही...

» अटल बिहारी वाजपेयी यांच्यासारखं सर्वसमावेशक नेतृत्व भाजपमध्ये होतं. त्यासोबतच लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी हे सगळे एकेकाळी भाजपच वाढवण्याचं कार्य करत होते. त्यावेळी या सगळ्यांना जे जमलं नाही ते नरेंद्र मोदी यांनी करुन दाखवलं. 1984 नंतर पहिल्यांदा 2014 मध्ये पूर्ण बहूमत असणारं सरकार अस्तित्वात आलं. 1984 नंतर कधीही भारतात पूर्ण बहूमत कोणत्याही पक्षाला मिळालं नव्हतं. मात्र हे एकहाती सत्ता नरेंद्र मोदी यांनी निर्माण केली. त्यांनी केलेला हा करिष्मा आपल्याला नाकारता येऊ शकत नसल्याचं ते म्हणाले.

### "...आता आघाडी सरकारच चालणार!

»नरेंद्र मोदी यांनी एकहाती सत्ता मिळवली. सगळ्यांनी देशाचं हित कशात आहे हे बघायला हवं. देशाचं भलं कशात आहे हे पाहिलं पाहिजे आणि भारताला पुढे नेलं पाहिजे, असंही ते म्हणाले.

मोदींचा करिष्मा आपण पाहिला आहे. आता त्याच्यानंतर कोण? असं विचारल्यास एकही नाव पुढे येत नाही. मोदींनंतर कोण?, असं अजित पवारांना विचारल्यास वेळ येईल तेव्हा नक्की उत्तर देईल, अशी मिश्किल टिप्पणी अजित पवार यांनी केली आहे. अजित पवारांचं हे उत्तर ऐकताच सभागृहात हशा पिकला.

---

# सांगली: ऐतवडे बुद्रुकला विकासाचे 'रोल मॉडेल' बनविण्याचा संकल्प!

## सरपंच सुभाष कुंभार यांचा निर्धार : सुसज्ज रस्ते, केबीपी महाविद्यालयाच्या इमारतीचा 'मेकओव्हर'

। सांगली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

सांगली जिल्ह्यातील ऐतवडे बुद्रुकमध्ये प्रवेश करताना झाडांची गार सावली अनुभवयाला मिळणार आहे. या ठिकाणी सुसज्ज रस्ता निर्माण करताना रस्त्याच्या मधोमध झाडे लावण्यात येणार आहेत. याबरोबरच गावातील जीर्ण झालेल्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या इमारत डागडुजीसाठी देखील प्रयत्न केले जाणार आहेत. या कामांसह लाखो रुपयांची कामे विविध फंडातून करण्यात येणार असून, विकासाचे 'रोल मॉडेल' तयार करण्याचा निर्धार (व्हिजन) ऐतवडे बुद्रुक गावचे सरपंच सुभाष कुंभार यांनी केला आहे. या सर्व कामांसोबत आणखी नवीन उपक्रम गावात राबविण्याचा मानस असल्याचे सरपंच सुभाष कुंभार यांनी सांगितले.

गावचे नवनियुक्त सरपंच सुभाष कुंभार यांच्याशी 'महाईन्यूज' च्या वतीने संपर्क साधत गावच्या विकासाचे 'व्हिजन' जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या वेळी त्यांनी संवाद साधताना गावात कोणत्या कामांचे नियोजन आहे त्याचा आराखडा मांडला.

कुंभार म्हणाले की, लाडेगाव वरून ऐतवडे बुद्रुक मध्ये प्रवेश करताना सुसज्ज आणि सावली देणारे रस्ते अनुभवायला मिळणार आहेत. मराठी मुलांची शाळा ते ऐतवडे बुद्रुक फाटा (कावखडी) दरम्यान येण्यासाठी आणि जाण्यासाठी दुहेरी रस्ता करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी आमदार, खासदार आदी लोकप्रतिनिधींकडे निधीसाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. रस्ता तयार करताना रस्ताच्या मधोमध फळे देणारी झाडे देखील लावण्याचे नियोजन आहे.

जंगली शोभेची झाडे न लावता जांभूळ, चिंच आणि आवळाचे झाड लावण्यात येणार आहे. जेणेकरून या रस्त्यावरून ये जा करताना नागरिकांना फळे खाता येणार आहेत. तसेच सावली देखील मिळणार आहे. या कामाबरोबरच गावात असणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात पंचक्रोशीतील गावातील गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत आहेत. ज्ञानात भर घालणाऱ्या या महाविद्यालयाची इमारत सध्या जीर्ण झाली आहे. त्याच्या डागडुजीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा खा. शरद पवार यांची भेट घेऊन ५० लाख रुपये निधी देण्यासाठी विनंती केली आहे.

खा. पवारांनी देखील त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे कुंभार म्हणाले. निधी मिळाल्यानंतर तात्काळ कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.




### नवीन उपक्रम राबवण्याचा प्रयत्न...

» गावात कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मोठे स्मारक करण्यासाठी संस्थेच्या वतीने प्रयत्न सुरु आहेत. त्यासाठी १ एकर जागेची मागणी केली आहे. संबधित नियोजित जागेची स्वच्छता ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच संस्थेच्या वतीने स्मारक करत असताना आवश्यक त्या मदतीसाठी देखील प्रयत्न करणार असल्याचे कुंभार म्हणाले. या बरोबरच गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय टाळण्यासाठी पाण्याचे एटीएम सुरु करण्याचे अभिनव उपक्रम नुकताच राबविण्यात आला. ग्रामपंचायत मधील सहकाऱ्यांच्या सोबतीने त्याचे नुकतेच उदघाटन देखील करण्यात आले आहे. या सर्व कामांसोबत आणखी नवीन उपक्रम गावात राबविण्याचा मानस असल्याचे सरपंच सुभाष कुंभार यांनी सांगितले.

### 'तेंडल्या'तील कलावंतांचा सत्कार...

»दरम्यान, ऐतवडे बुद्रुक गावातील बाल कलाकार ओंकार गायकवाड व दिग्विजय काळगावे यांचा समावेश असणाऱ्या 'तेंडल्या' या चित्रपटाचे गावातील यात्रेनिमित्त असणाऱ्या कलापथक कार्यक्रमावेळी प्रमोशन करण्यात आले. हा चित्रपट ५ मे रोजी प्रदर्शित होणार असल्याची माहिती दिली व चित्रपटाच्या उत्तुंग यशाबद्दल शुभेच्छा दिल्या. तसेच, गावतील या बालकलाकारांचा सत्कारही करण्यात आला. यावेळी सरपंच सुभाष कुंभार, तंटामुक्ती अध्यक्ष प्रवीण गायकवाड, कुस्ती कमिटीचे प्रवीण वंडकर, यात्रा कमिटीचे किरण कदम, प्रकाश गायकवाड व इतर उपस्थित होते.

# ईदचा चंद्र दिसला!

## देशभरात साजरी होणार रमजान ईद

।नवी दिल्ली महाईन्यूज।

**रमजानचा पवित्र महिना आता संपला असून आज ईदचा चंद्र दिसल्यानं उद्या (२२ एप्रिल) देशभरात ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईद साजरी होणार आहे. यापार्श्वभूमीवर मुस्लिम बांधवांमध्ये या उत्सवाचा उत्साह असून त्याहष्टीनं ते तयारीलाही लागले आहेत. यामुळं गेल्या महिन्याभरापासून सुरु असलेले रोजेही आता संपले आहेत.**

कालच सौदी अरेबिया आणि अखाती देशांमध्ये ईदचा चंद्र दिसला होता त्यामुळं आजच त्या ठिकाणी ईद साजरी झाली. आज भारतातही चंद्र दिसल्यानं मुस्लिम धर्मियांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. शिया चंद समितीनं शुक्रवारी चंद्र दिसल्याची घोषणा करत उद्या ईद साजरी होणार असल्याचं जाहीर केलं आहे.



### शिरखुर्म्यासाठी ओळखली जाते रमजान ईद

ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईद साजरी करताना मुस्लिम धर्मियांच्या घरी खिरखुर्म्याचा खास बेत असतो. यांसह अनेक गोड पदार्थही केले जातात. या फराळासाठी नातेवाईक आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांना निमंत्रणही दिलं जातं. मुस्लिम समाजातील हा सर्वात पवित्र आणि मोठा सण असल्यानं या दिवशी नवीन कपड्यांसह भेटवस्तू दिल्या जातात.



## अतिक अहमदच्या हत्येनंतर अल कायदाची भारताला धमकी!

।नवी दिल्ली महाईन्यूज।

गँगस्टर अतिक अहमद आणि त्याचा भाऊ अश्रफ अहमद याची नुकतीच गोळ्या घालून हत्या करण्यात आली. पण आता या हत्येचा बदला घेण्याची धमकी अल कायदा या दहशतवादी संघटनेनं भारताला दिली आहे.

अल कायदानं ईद निमित्त काढलेल्या सात पानी पुस्तकाद्वारे ही धमक देण्यात आली आहे. आपल्या संदेशात अतिक आणि अश्रफ यांना शहीद असंही संबोधलं आहे.

त्याचबरोबर मुस्लिमांना आम्ही मुक्त करणार आहोत, असंही या पत्रात त्यांनी म्हटलं आहे.

## भारतात कोरोनाचा भयानक वेग! 24 तासांत आढळले तब्बल 'इतके' नवे रुग्ण

।नवी दिल्ली महाईन्यूज।

भारतात कोरोना विषाणूचा (CORONAVIRUS) धोका अजूनही कायम आहे. आजही देशात कोरोना विषाणूच्या दैनंदिन रुग्णांची संख्या 10 हजारांच्या पुढं गेली आहे.

आरोग्य मंत्रालयानं शुक्रवारी जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, गेल्या 24 तासांत भारतात कोरोना विषाणूचे 11,692 नवीन रुग्ण आढळले आहेत, तर सक्रिय रुग्णांची संख्या 66,170 आहे.

आरोग्य मंत्रालयानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार, या संसर्गामुळं 28 रुग्णांचा मृत्यू झाला आहे. भारतात संसर्गाचा दैनंदिन दर 5.46 टक्के आहे, तर साप्ताहिक दर 5.32 टक्के आहे. सध्या देशात 66170 लोकांवर उपचार सुरू आहेत, जे एकूण प्रकरणांपैकी 0.15 टक्के आहे.

भारतातील रुग्ण बरं होण्याचा राष्ट्रीय दर 98.67 टक्के आहे. देशात आतापर्यंत एकूण 4,48,69,68 लोक संसर्गमुक्त झाले आहेत, तर कोविड-19 मुळं मृत्यूचं प्रमाण 1.18 टक्के आहे. आरोग्य मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, देशव्यापी लसीकरण मोहिमेअंतर्गत भारतात आतापर्यंत अँटी-कोविड 220.66



## अमित शाहांच्या रोड शोच्या हौसेवर पाणी

### बेंगळुरुजवळील देवनहल्ली येथे पावसामुळे कार्यक्रम रद्द

।कर्नाटक।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भाजप पक्षाचे नेते आणि त्यांच्या प्रचार सभा, रोड शो हे कायमच चर्चेचा विषय बनला असतो. पण आज (ता. 21 एप्रिल) होणाऱ्या अमित शाह यांच्या रोड शोच्या पावसामुळे रद्द करण्यात आला आहे.**

भाजप पक्षाचे नेते आणि त्यांच्या प्रचार सभा, रोड शो हे कायमच चर्चेचा विषय बनला असतो. पण आज (ता. 21 एप्रिल) होणाऱ्या अमित शाह यांच्या रोड शोच्या पावसामुळे रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या या रोड शोच्या मध्ये पाऊस आला, अशी चर्चा करण्यात येत आहे. बेंगळुरूजवळील देवनहल्ली येथे मुसळधार पावसामुळे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा रोड शो पुढे ढकलण्यात आला आहे. तामिळनाडू भाजपचे अध्यक्ष के अन्नामलाई यांच्याकडून ही माहिती देण्यात आली. परंतु, लवकरच पुन्हा अमित शाह यांच्या रोड शोची नवी तारिख जाहीर केली जाईल, अशी माहिती सुद्धा अन्नामलाई यांनी दिली आहे.

तत्पूर्वी, गृहमंत्री अमित शाह शुक्रवारी दोन दिवसांच्या कर्नाटक दौऱ्यावर जाणार होते. जिथे ते 21 आणि 22 एप्रिलला अनुक्रमे दावणगेरे आणि देवनहल्ली येथे रोड शो करणार होते. देवहल्ली हे 18 व्या शतकातील म्हैसूरचे शासक टिपू सुलतान यांचे जन्मस्थान आहे. यादरम्यान ते 10 मे रोजी होणाऱ्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बंगळुरू येथे भारतीय जनता पक्षाच्या संघटना पातळीवरील बैठकांमध्ये सहभागी होणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शाह हे राज्यातील अनेक नेत्यांची बैठक घेणार आहेत ज्यांना निवडणूक प्रचाराची जबाबदारी देण्यात आली आहे. या बैठकीमध्ये निवडणुकीच्या रणनीतीवर विचारमंथनही करण्यात येणार आहे.

मोदींव्यतिरिक्त, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि केंद्रीय मंत्र्यांची प्रभावी पथक नेमण्यात आले आहे. आगामी निवडणुकीसाठी पक्षाच्या 40 स्टार प्रचारकांची यादी देखील तयार करण्यात आली आहे. कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी 10 मे रोजी मतदान होणार असून 13 मे रोजी निकाल जाहीर होणार आहेत.LABOUR MARKET मध्ये काम करणारे साडे पाच करोड तरुण हे GRADUATE आहेत. या रिपोर्टमध्ये असं सांगण्यात आलयं की भारतात अशा तरुणांची संख्या 2030 पर्यंत 30 करोड होईल ज्यांचं शिक्षण 10 हून अधिक असेल. परंतु या तरुणांमध्ये BASIC स्किल्स नसणारेत त्यामुळे या तरुणांना भविष्यात नोकरी मिळणार नाही. भारतात तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे तरुणांनी आपलं भविष्य सुरक्षित करण्यासाठी शिक्षण घेत असतानाच दुसरे काही SKILLS शिकण गरजेचं आहे जे भविष्यात उपयोगी आहेत.



### पंतप्रधान मोदी करणार 20 रॅली आणि रोड शो

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी गुरुवारी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यातील निवडणूक प्रचारादरम्यान सुमारे 20 ठिकाणी रॅली आणि रोड शो करणार आहेत. पंतप्रधानांच्या प्रचार कार्यक्रमाला अंतिम स्वरूप देण्यात येत असल्याचे देखील त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. प्रचारादरम्यान पंतप्रधान मोदींच्या कार्यक्रमांमध्ये रॅली, जाहीर सभा आणि रोड शो यांचा समावेश आहे.

# कसा वाटला मग पब्लिकला भाईजान



सलमान खानचा या वर्षातील बहूप्रतिक्षित चित्रपट 'किसी का भाई किसी की जान' हा आज म्हणजेच 21 एप्रिल 2023 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. सलमानच्या इतर चित्रपटांप्रमाणे हा चित्रपटही ईदच्या एक दिवस आधी रिलीज झाला. सलमानच्या चाहत्यांना या चित्रपटांची खुपच प्रतिक्षा लागलेली होती.

चित्रपट रिलिज होण्याआधीच या चित्रपटाची अ‍ॅडव्हास बुकिंग फुल झाली होती असा दावा करण्यात येत होता. चित्रपट रिलीज होताच सलमानच्या चाहत्यांनी सगळीकडे थिएटर मध्ये गर्दी केली आणि जल्लोष सुरू केला आहे.

ट्विटरवर सकाळपासून चित्रपटाचे अनेक स्क्रीनशॉट आणि व्हिडिओ व्हायरल होत आहेत. चाहते थिएटरमधूनच चित्रपटाची अपडेट्स देत आहेत. प्रेक्षकांमध्ये चित्रपटाची प्रचंड क्रेझ आहे असं दिसत आहे. आता अनेकांनी ट्विटरवर या चित्रपटाचा रिव्ह्यू द्यायला सुरवात केली आहे.

ट्विटरवर मात्र या चित्रपटाबद्दल समिश्र प्रतिक्रिया देत आहे. एकीकडे चाहत्यांनी या चित्रपटावर कौतुकाचा वर्षाव करण्यास सुरूवात केली आहे. पण चित्रपटाच्या पूर्वार्धाची चर्चा आहे आणि बहुतेक नेटकरी या चित्रपटाचा इंटरव्हल खुपच खराब असल्याच सांगत आहे.

सलमान खानच्या किसी का भाई किसी की जानच्या ट्विटवरील प्रतिक्रिया पाहुया. एकाने या चित्रपटाला निराशाजनक म्हणत फक्त साउथ चित्रपटाची कॉपी केली असल्याच म्हटलं आहे. तर दुसऱ्याने या चित्रपटाला डिझास्टर म्हटलं आहे.

त्याबरोबर काहींना या चित्रपटातील सलमानची कॉमेडी आणि अ‍ॅक्शन सीन्स खुप आवडले आहे. तर काहींना हा चित्रपट खुपच मनोरंजन करणारा वाटला आहे.

# प्राजक्ता माळीने केला लव्ह लाईफबद्दल खुलासा



नुकतंच प्राजक्ताने तिच्या लव्ह लाईफबद्दल मोठा खुलासा केला.

मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळी ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. प्राजक्ताने अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केलं आहे. 'जुळून येती रेशीमगाठी', 'नकटीच्या लग्नाला यायचं हं' यांसारख्या प्रसिद्ध मालिकेतून प्राजक्ता घराघरात पोहोचली. प्राजक्ताच्या खासगी आयुष्याची कायमच चर्चा होताना दिसते. नुकतंच प्राजक्ताने तिच्या लव्ह लाईफबद्दल मोठा खुलासा केला.

गेल्या काही दिवसांपासून प्राजक्ता माळीच्या लग्नाबद्दलची चर्चा सुरु आहे. नुकतंच 'लोकमत फिल्मी'ला तिने एक मुलाखत दिली. यावेळी तिला 'तू पहिल्यांदा कोणाला प्रपोज केलं होतं', असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर प्राजक्ताने हसत हसत उत्तर दिले."मी प्रपोज नक्कीच केलं आहे. मलाच प्रपोज करावं लागलं, कारण माझ्या आजूबाजूला जी मुलं होती ती फारच साधी, सरळ होती", असे प्राजक्ता म्हणाली."मी त्यांना डायरेक्ट प्रपोज केलं नव्हतं. तू बरा वाटतोस, चल मग बघू काही होतंय का, असं मी त्याला म्हटलं होतं", असा किस्साही तिने सांगितला.दरम्यान प्राजक्ता माळी ही कायमच विविध कारणांमुळे चर्चेत असल्याचे पाहायला मिळते. ती लवकरच एका चित्रपटात झळकणार आहे.

मात्र याचे नाव अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही.

# शैलेश लोढांची असित मोदींच्या कंपनीविरोधात तक्रार



अभिनेते शैलेश लोढा व तारक मेहता का उल्टा चश्मा या मालिकेच्या निर्मात्यामधील वाद नवा नाही. एक दशकापेक्षा जास्त काळ या मालिकेत तारक मेहता यांची भूमिका साकारणाऱ्या शैलेश लोढा यांनी निर्मात्यांबरोबरच्या वादानंतर मालिका सोडली. ते सातत्याने अप्रत्यक्षपणे निर्माते असित मोदी यांच्यावर टीकाही करत असतात, पण त्यांनी वादाचं व मालिका सोडण्याचं कारण स्पष्ट केलं नव्हतं. अशातच आता त्यांनी निर्मात्यांविरोधात तक्रार दिली आहे.शैलेश यांनी असित मोदींच्या प्रॉडक्शन कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शैलेश लोढा यांनी गेल्या वर्षी एप्रिलमध्ये असित मोदीबरोबर झालेल्या वादानंतर शो सोडला होता. निर्मात्यांनी जवळपास एका वर्षापेक्षा जास्तची थकबाकी शैलेश यांना दिली नाही. त्यामुळे सहा महिने वाट पाहिल्यानंतर आता त्यांनी असित मोदींच्या प्रोडक्शन कंपनीवर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

शैलेश लोढा यांनी वेळेत पगार न मिळाल्याने असित मोदी यांच्या प्रॉडक्शन कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शैलेश नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलमध्ये गेले आणि कलम ९ अंतर्गत त्यांनी तक्रार दिली. या प्रकरणी मे महिन्यात सुनावणी होणार आहे.

हे प्रकरण विचाराधीन असून न्यायालयात आहे, त्यामुळे मी सध्या यावर भाष्य करणार नाही, असं शैलेश यांनी म्हटलंय.दरम्यान, असित मोदी यांनी यावर प्रतिक्रिया देण्यास नकार दिला, परंतु शोचे प्रोजेक्ट हेड सोहिल रमाणी म्हणाले, "आम्ही त्यांना मेल आणि कॉलद्वारे सर्व कागदपत्रे पूर्ण करण्याची आणि त्यांचा उर्वरित पगार घेण्याची विनंती केली होती. आम्ही त्याला पगार देण्यास कधीच नकार दिला नाही. प्रत्येक कंपनीत नोकरी सोडल्यानंतर पेपरवर्क केले जाते. त्यांनी इकडे-तिकडे तक्रार करण्याऐवजी साधी पद्धत फॉलो केली असती, तर बरं झालं असतं. आम्ही त्यांचा पगार देण्यास नकार दिलेला नाही.

# टॉपलेस फोटोंची सोशल मीडियावर चर्चा



अमृता खानविलकर

कलाकारांचे स्टायलिस्ट फोटो सोशल मीडियावर नेहमीच चर्चेचा विषय ठरतात. कलाकारांचं खास फोटोशूट हा चाहत्यांचा आवडीचा विषय. काही कलाकार मंडळी तर न्यूड फोटोशूट, टॉपलेस फोटोशूट करतात. त्यांचे हे फोटो सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होताना दिसतात. असंच आता अभिनेत्री आशा नेगीच्या बाबतीत घडलं आहे. आशाने टॉपलेस फोटोशूट केलं आहे. तिच्या या फोटोंची सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे.

'पवित्र रिश्ता' या मालिकेमुळे आशा घराघरांत पोहोचली. या मालिकेनंतर तिच्या चाहतावर्गामध्येही प्रचंड वाढ झाली. आशा छोट्या पडद्यापर्यंतच मर्यादित राहिली नाही. तिने बॉलिवूडमध्येही पदार्पण केलं. 'ल्युडो' या चित्रपटामध्ये तिने अभिषेक बच्चनबरोबर काम केलं आहे. एकीकडे आशा तिच्या कामामुळे चर्चेत असताना दुसरीकडे तिच्या टॉपलेस फोटोंनी सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे.आशाने शेअर केलेल्या फोटोंमध्ये तिने फक्त अंगाभोवती टॉवेल गुंडाळलेला दिसत आहे. तसेच तिचा हा फोटो तिच्या बेडरुममधील असल्याचं दिसत आहे. तिने बेडवर बसून हे हॉट फोटोशूट केलं आहे. आशाच्या या फोटोंवर अनेकांनी विविध कमेंट केल्या आहेत. काहींनी तिच्या या लूकचं कौतुक केलं आहे तर काहींनी तिला ट्रोल करण्यासही सुरुवात केली आहे.

# चेन्नई एक्सप्रेस सुसाट!

## CSK चा हैदराबादवर सोपा विजय, जडेजा आणि कॉनवे ठरले मॅचविनर

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**रवींद्र जडेजाची अचूक गोलंदाजी आणि डेव्हॉन कॉनवेच्या अर्धशतकाच्या जोरावर चेन्नईने सहजपणे हैदराबादवर विजय साकारला. चेन्नईने हैदराबादच्या धावांवर अंकुश ठेवला. त्यामुळे त्यांना १३४ धावा करता आल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना कॉनवेने अर्धशतक झळकावले आणि चेन्नईला सात विकेट्स राखून मोठा विजय मिळवून दिला.**

चेन्नईपुढे १३५ धावांचे हैदराबादचे माफक आव्हान होते. पण कधी कधी माफक आव्हान असले तरी त्याचा पाठलाग करताना संघाला सुरुवातीला धक्के बसल्याचे पाहायला मिळते. पण यावेळी मात्र तसे झाले नाही. कारण यावेळी ऋतुराज गायकवाड आणि डेव्हॉन कॉनवे यांनी धडाकेबाज फटकेबाजी केली. ऋतुराजपेक्षा यावेळी कॉनवे जास्त आक्रमक असल्याचे पाहायला मिळाले.



या दोघांनी ११ षटकांत ८७ धावांची सलामी दिली होती. त्यामुळे हे दोघे आता संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब करतील, असे वाटत होते. पण यावेळी ऋतुराज दुर्देवीपणे धावचीत झाला. ऋतुराजला यावेळी ३० चेंडूंत २ चौकारांच्या जोरावर ३५ धावा करता आल्या. ऋतुराज बाद झाला असला तरी कॉनवे मात्र दमदार फटकेबाजी करत होता. कॉनवेने यावेळी आपले अर्धशतकही पूर्ण केले. ऋतुराजनंतर अजिंक्य रहाणे फलंदाजीला आला पण त्याला ९ धावांवर समाधान मानावे लागले.

धोनीने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करायचा निर्णय घेतला आणि त्यांच्या गोलंदाजांनी कर्णधाराचे शब्द खरे करून दाखवले. कारण चेन्नईच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच हैदराबादच्या संघाला धक्के द्यायला सुरुवात केली होती. हैदराबादच्या संघाने चांगली सुरुवात करण्याचा प्रयत्न केला खरा, पण त्यांच्या सलामीवीरांना मोठी खेळी साकारता आली नाही. हॅरी ब्रुक्सने काही फटके चांगले मारले खरे, पण आकाश सिंगने त्याला १८ धावांवर बाद केले आणि हैदराबादला पहिला धक्का बसला. त्यानंतर अभिषेक वर्मा हा चांगली फलंदाजी करत होता.

पण यावेळी रवींद्र जडेजाने त्याला ३५ धावांवर बाद केले आणि चेन्नईला मोठे यश मिळवून दिले. जडेजा यावेळी फक्त एकाच विकेटवर थांबला नाही तर त्याने त्यानंतर राहुल त्रिपाठीलाही २१ धावांवर बाद केले. जडेजाने मयांक अगरवालला चांगलेच चकवले आणि धोनीकरवी त्याला यष्टीचीत केले. मयांकला यावेळी फक्त दोन धावात करता आल्या. हैदराबादच्या फलंदाजांना यावेळी योग्य लय सापडलीच नाही. त्यामुळे त्यांना यावेळी मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

चेन्नईच्या गोलंदाजांनी हैदराबादच्या धावसंख्येवर चांगलीच वेसण घेतली त्यामुळे त्यांना यावेळी १३४ धावाच करता आल्या.

---

# आयपीएलच्या १६व्या हंगामाच्या प्लेऑफ आणि अंतिम सामन्याचे वेळापत्रक जाहीर

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) २१ एप्रिलच्या संध्याकाळी आयपीएलच्या १६व्या प्लेऑफ आणि अंतिम सामन्यांच्या तारखांबाबत वेळापत्रक जाहीर केले. ज्यामध्ये या मोसमातील पहिला क्वालिफायर सामना २३ मे रोजी आणि एलिमिनेटर सामना २४ मे रोजी चेन्नईच्या मैदानावर, तर दुसरा क्वालिफायर आणि अंतिम सामना २६ आणि २८ मे रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल.**




या हंगामातील लीग टप्प्यातील सामने २१ मे रोजी संपतील. यानंतर प्लेऑफ टप्प्यातील सामने आयोजित केले जातील. २३ मे रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर होणाऱ्या पहिल्या क्वालिफायरमध्ये गुणतालिकेत पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर असलेल्या संघांमध्ये सामना खेळवला जाईल.त्यानंतर अर्शदीपने दिनेश कार्तिकला ७ धावांवर झेलबाद केलं.यानंतर २४ मे रोजी या मोसमातील एलिमिनेटर सामना पॉइंट टेबलमध्ये तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर असलेल्या संघांमध्ये चेन्नईच्या मैदानावरच खेळवला जाईल. या मोसमातील दुसरा क्वालिफायर सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. या सामन्यात, पहिल्या क्वालिफायर सामन्यात पराभवाचा सामना करणारा संघ आणि एलिमिनेटर सामना जिंकणारा संघ यांच्यात सामना होणार आहे.

### आयपीएलच्या 16व्या हंगामाचा अंतिम सामना

» इंडियन प्रीमियर लीगच्या १६व्या हंगामाचा अंतिम सामना २८ मे रोजी होणार आहे. या मोसमातील पहिला सामनाही याच स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे, तर गेल्या मोसमातील अंतिम सामना येथेच झाला होता. या सीझनबद्दल बोलायचे तर यामध्ये एकूण ७० लीग सामने खेळले जाणार आहेत, ज्यामध्ये आतापर्यंत एकूण २८ सामने खेळले गेले आहेत. यानंतर प्लेऑफचे सामने आयोजित केले जातील.

### आयपीएल 2023 प्लेऑफचे वेळापत्रक

» २३ मे – क्वालिफायर एक सामना (चेन्नई)
»२४ मे – एलिमिनेटर सामना (चेन्नई)
»२६ मे – क्वालिफायर दोन सामना (अहमदाबाद)
»२८ मे – अंतिम सामना (अहमदाबाद)

**१२ मैदानांवर ५२ दिवसांत एकूण ७० सामने खेळवले जात आहेत –**

या वेळी ही स्पर्धा अहमदाबाद, मोहाली, लखनौ, हैदराबाद, बंगळुरू, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, जयपूर, मुंबई, गुवाहाटी आणि धर्मशाला या 12 ठिकाणी खेळवली जात आहे. या १२ मैदानांवर ५२ दिवसांत एकूण ७० सामने खेळवले जात आहेत.